क्र.विशिउ/पुवि/२०१५/प्राथ/25805
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय
कॅम्प - आयुक्त शिक्षण कार्यालय, म.रा, पुणे
दिनांक :- ९.१२.२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य

................

पुणे, अहमदनगर, सोलापूर (पुणे विभाग) सर्व

विषय :- **कॅपीटेशन फी ॲक्ट १९८८ नुसार तीन वर्षातून एकदाच फी वाढविण्याबाबत.**

संदर्भ :- श्रीमती अनुभा सहाय,अध्यक्ष, POPSOM यांचेबरोबर झालेली चर्चा व त्यांचा अर्ज

दि.०९/१२/२०१५

वरील संदर्भात आज दिनांक ९/१२/२०१५ रोजी दुपारी ४.०० वा. POPSOM संघटनेच्या संबंधित प्रतिनिधींबरोबर अध्यक्ष श्रीम.अनुभा सहाय, उपाध्यक्ष श्रीम.मीरा दिलीप यांसमवेत झालेल्या चर्चेनुसार कॅपीटेशन फी १९८८ ॲक्ट नुसार प्रत्येक शाळेने दरवर्षी फी वाढ करु नये. सदर फी वाढ कायदयाप्रमाणे तीन वर्षातून एकदाच करण्यात यावी.

तसेच फी रेग्युलेशन ॲक्ट २०११ नुसार कमिट्या अस्तित्वात येणार आहेत. याबाबतची प्रक्रिया सुरु झाली असुन यासंदर्भातील तक्रारी कमिटयांमार्फत सोडविल्या जातील.

ज्या शाळांनी त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या फी कायदयाप्रमाणे गत तीन वर्षात फी घेतलेली नसेल तर ती फी अवैध ठरते. त्यामुळे संबंधित शाळांनी नियमानुसारच फी घ्यावी. तसेच शाळेने सुरुवातीस एका महिन्याच्या टयुशन फी इतकीच प्रवेश (ॲडमिशन) फी आकारावी. शाळा स्तरावर पालकांना गणवेश, बुट, जेवण व इतर साहित्य शाळेतून घेण्याबाबत सक्ती करु नये.जर सातत्याने दरवर्षी बेकायदेशीरपणे फी वाढ केली असेल तर अशी फी पालकांना परत करावी.

**(रामचंद्र जाधव)**
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे